**श्री.मंगेश मेमोरियल एज्युकेशन सोसायटी संचालित श्री. मंगेश मेमोरियल इंटरनॅशनल स्कूल, बालाजी नगर दौंड, जि. पुणे या शाळेचे, अशोकनगर लिंगाळी जि.पुणे स्थलांतराबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः माशास्थ ३३२३/प्र.क्र.४१३/एसएम-१**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २५ एप्रिल, २०२३

वाचा :

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : माशास्थ ३३२१/प्र.क्र.४०१/एसएम-१ दिनांक २८ जुलै, २०२१.**

संदर्भ :

**विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे जा.क्र. शिउसं/प्राथ/ २०४/ स्थलांतर/ पुवि/२०२२-२०२३/२४६०, दिनांक २३.०२.२०२३**

**प्रस्तावना :-**

श्री.मंगेश मेमोरियल एज्युकेशन सोसायटी संचालित श्री.मंगेश मेमोरियल इंटरनॅशनल स्कूल, बालाजी नगर दौंड, ता.दौंड जि.पुणे या इंग्रजी माध्यमाच्या स्वयंअर्थसहाय्यित (इयत्ता १ ली ते १२ वी, विज्ञान व वाणिज्य शाखा) उच्च माध्यमिक शाळेचे अशोकनगर लिंगाळी ता.दौंड, जि.पुणे येथे स्थलांतरास मान्यता देण्याचा संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त शाळेने सध्याच्या ठिकाणी अपु-या भौतिक सुविधा असल्यामुळे परिपुर्ण इमारतीत, अशोकनगर लिंगाळी ता.दौंड, जि.पुणे येथे स्थलांतर प्रस्तावित केले आहे. त्यामुळे सदर शाळेचे वर नमूद ठिकाणी स्थलांतर करण्यास खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे.:-

(१) स्थलांतरीत शाळेची किमान पटसंख्येची अट कोणत्याही कारणास्तव शिथिल केली जाणार नाही. तसेच सर्व विद्यार्थ्यांना स्थलांतराच्या ठिकाणी सामावून घेणे आवश्यक राहील.

(२) सदर शाळा इंग्रजी माध्यमाची स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील असल्याने शाळेत कार्यरत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांचे संपूर्ण दायित्व संस्थेवर राहील.

(३) शासनाकडून शाळा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/वेतनेतर अनुदान, विद्यार्थी इ.संदर्भात वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ.चे पालन संस्थेने करणे आवश्यक राहील.

(४) शाळेच्या बाबतीत मुळ शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाहीत.

(५) श्री. मंगेश मेमोरियल इंटरनॅशलन स्कूल या नावाने एकाच आवारात प्राथमिक (इ.१ ली ते ७ वी Udise Code २७२५०४०५५०६) तसेच उच्च माध्यमिक (इ. ५ वी ते १२ वी Udise Code २७२५०४०५५२६) या दोन शाळा भरतात या निर्णयाची अंमलबजावणी करतांना दोन्ही शाळांचे एकत्रिकरण करून एकच Udise code कार्यान्वित ठेवावा.

(६) सदर स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप आल्यास किंवा स्थलांतरासंदर्भातील अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास स्थलांतर रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी सदर शाळेच्या स्थलांतराबाबत पुढील कार्यवाही १५ दिवसांत करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०४२५१७२०२४०१२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAVIN RAJARAM MUNDHE

Digitally signed by PRAVIN RAJARAM MUNDHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DC78036626EC580D66C0AC502D43AF5F670B5BA13F51213AD071ACD53714A284, cn=PRAVIN RAJARAM MUNDHE
Date: 2023.04.25 17:25:43 +05'30'

**( प्रविण मुंढे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
४. अध्यक्ष/ सचिव, श्री.मंगेश मेमोरियल एज्युकेशन सोसायटी, जि.पुणे
५. निवडनस्ती (एसएम-१).

महाराष्ट्र शासन
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१
दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२२१७
ई मेल आय.डी.क्रं *dydpune@gmail.com*
फॅक्स क्रमांक ०२०-२६१२५६९६
वेब साईट आयडी क्रमांक *www.dydepune.com*

जा.क्र.शिउसं/प्राथ-२०४/शाळा स्थलांतरण/२०२३/4069

दिनांक : 11 MAY 2023

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, पुणे

विषय : श्री. मंगेश मेमोरियल एज्युकेशन सोसायटी संचलित श्री. मंगेश मेमोरियल इंटरनॅशनल स्कूल, बालाजीनगर, दौंड, जि.पुणे या शाळेचे अशोकनगर लिंगाळी, जि.पुणे स्थलांतरणाबाबत

संदर्भ : १. या कार्यालयाचे समक्रमांक २०२२-२०२३/२४६०, दिनांक २३/२/२०२३
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक माशास्थ ३३२३/प्र.क्रं.४१३/एसएम-१ दिनांक २५ एप्रिल, २०२३

उपरोक्त विषयान्वये मा. शिक्षण संचालनालयास, या कार्यालयास व आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेला संदर्भ क्रं. २ चा शासन निर्णय पहावा. संदर्भीय शासन निर्णय क्रमांक २ नुसार शासनाने श्री. मंगेश मेमोरियल एज्युकेशन सोसायटी संचलित श्री. मंगेश मेमोरियल इंटरनॅशनल स्कूल, बालाजीनगर, दौंड, जि.पुणे या इंग्रजी माध्यमाच्या स्वंयअर्थसहाय्यित (इयत्ता १ ली ते १२ वी, विज्ञान व वाणिज्य शाखा) उच्च माध्यमिक शाळेने सध्याच्या ठिकाणी अपु-या भौतिक सुविधा असल्यामुळे परिपुर्ण इमारतीत, अशोकनगर, लिंगाळी, ता.दौंड, जि.पुणे येथे स्थलांतर प्रस्तावित केले आहे. त्यामुळे सदर शाळेचे वर नमूद ठिकाणी स्थलांतर करण्यास संदर्भीय क्रमांक २ च्या शासन निर्णयामध्ये नमूद १ ते ६ अटी व शर्तीवर मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

संदर्भीय क्रं. २ च्या शासन निर्णयातील अटी सदर संस्थेस बंधनकारक असून सदर अटी व शर्तीनुसार श्री. मंगेश मेमोरियल एज्युकेशन सोसायटी संचलित श्री. मंगेश मेमोरियल इंटरनॅशनल स्कूल, बालाजीनगर, दौंड, जि.पुणे या इंग्रजी माध्यमाच्या स्वंयअर्थसहाय्यित (इयत्ता १ ली ते १२ वी, विज्ञान व वाणिज्य शाखा) उच्च माध्यमिक शाळेचे स्थलांतर करणेबाबत आपल्या स्तरावरुन पुढील योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सर्व संबंधितांना, शासनास तसेच या कार्यालयास अवगत करावा.

(औदुंबर उकिरडे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे

प्रत : माहितीस्तव सविनय सादर
मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,विस्तार भवन,मुंबई-३२.
प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी रवाना
१. अध्यक्ष/सचिव, श्री. मंगेश मेमोरियल एज्युकेशन सोसायटी, पुणे
२. मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल, लाखणगांव, जि.पुणे

महाराष्ट्र शासन

क्रमांक : पीएसएस २००३/(४८२/२००३)/प्राशि -३
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २१ जून, २००३

विभागीय शिक्षण उपसंचालक
पुणे

**विषय : सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाची खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देणेबाबत**

सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षी परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच व्यावसायिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेला तिच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही. या अटीवर जून २००३ पासून प्राथमिक शाळा सुरु करण्यास शासनाची परवानगी देण्यात येत आहे. परवानगी देण्याविषयीचा शासनाचा निर्णय संबंधित संस्थेस तात्काळ कळविण्यात यावा.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम |
|---|---|---|---|
| १ | श्री.मंगेश मेमोरियल एज्युकेशन सोसायटी,दौंड, जि.पुणे | बालाजी नगर,दौंड,जि. पुणे | इंग्रजी |

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : पीएसएस १०००/(५०९/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक २१ जुलै, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच शासनपत्र दिनांक २१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

४. प्राथमिक शाळेस शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळेला परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश संबंधित संस्थेस कळविण्यात यावेत. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

(सही)
(अ. गो. चोरेकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित
१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक / निवड नस्ती प्राशि-३